निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २८४ वा.
गुरुवार :१८ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# क्रीडामंत्री माणिकराव कोकाटेंचा राजीनामा; राज्यपालांची मंजुरी

## खाते उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे वर्ग

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी**/मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी आणि धक्कादायक घडामोड समोर आली असून राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठवलेल्या खातेबदलाच्या पत्रास राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी मंजुरी दिल्यामुळे हा निर्णय अधिकृत ठरला आहे. या निर्णयानंतर माणिकराव कोकाटे यांच्याकडील सर्व खाती आता उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. त्यामुळे राज्याच्या मंत्रिमंडळात महत्त्वाचा बदल झाला असून राजकीय वर्तुळात या घटनेची मोठी चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माणिकराव कोकाटे यांनी आपला राजीनामा थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सादर केला होता. त्यानंतर काही तासांतच सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांना खातेबदलाबाबत पत्र पाठवले आणि राज्यपालांकडून त्यास तात्काळ मंजुरी देण्यात आली. यामुळे कोकाटे यांचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास तसेच औकाफ विभाग ही खाती अधिकृतपणे अजित पवारांकडे वर्ग करण्यात आली आहेत.

दरम्यान, सदनिका घोटाळा प्रकरणामुळे माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली होती. नाशिक सत्र न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवल्याने त्यांच्या राजकीय कारकिर्दीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या निकालानंतर विरोधी पक्षांकडून कोकाटे यांच्या तात्काळ राजीनाम्याची जोरदार मागणी करण्यात येत होती. राजकीय दबाव वाढत असतानाच आज सकाळी माणिकराव कोकाटे हे मुंबईतील लिलावती रुग्णालयात दाखल झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.कोकाटे यांनी सत्र न्यायालयाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. मात्र या याचिकेवर सुनावणी शुक्रवार, २० डिसेंबर रोजी होणार आहे. त्याआधीच त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याने अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे. काही राजकीय विश्लेषकांच्या मते, न्यायालयीन प्रक्रियेचा राजकीय परिणाम कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असावा.



### कोकाटेंविरुद्ध अटक वॉरंट जारी

सदनिका घोटाळा प्रकरणातील याचिकाकर्त्या अंजली दिघोळ राठोड यांनी माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यासाठी नाशिक जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज सुनावणी होऊन न्यायालयाने कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. कोकाटे यांना नेमकी कधी अटक होणार, तसेच पुढील राजकीय घडामोडी कोणते वळण घेणार, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

**माणिकराव कोकाटे झाले बिनखात्याचे मंत्री**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकाटे यांचे मंत्रिपद काढून घेतल्याने सध्या ते बिनखात्याचे मंत्री बनले आहेत. त्यांच्या खात्यांची जबाबदारी अजित पवारांकडे देण्यात आल्याने मंत्रिमंडळातील कार्यभार अधिक केंद्रीत झाला आहे. क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग ही महत्त्वाची खाती सध्या अजित पवार पाहणार आहेत.

# प्रशासन हे सुशासन करण्यात ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांचे मोलाचे योगदान - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. प्रशासन हे पारदर्शक आणि लोकाभिमुख करून ते सुशासन करण्यासाठी संवाद कौशल्य आणि तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले. कन्नड येथील डीडीएल लॉनवर ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांचे एक दिवसीय उपविभागीय स्तरावरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सेवा हमी आयुक्त श्री किरण जाधव,कन्नड उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, मार्गदर्शक सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संजय कुंडेटकर ,खुलताबाद तहसीलदार स्वरूप कंकाळ, डॉ.शोएब मोहम्मद डॉ.उल्फत परदेसी, डॉ. मेघा शेवगण तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.

शासनाच्या प्रशिक्षण धोरण अंतर्गत सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन अध्यायवत व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना विविध सेवा सुविधा पारदर्शक, वेळेत आणि दर्जेदार उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशिक्षित केले जात आहे.



महाराष्ट्र राज्य प्रशासकीय यंत्रणेत ग्रामीण स्तरावर महसूल विभागाची भूमिका महत्वाची आहे. यामध्ये ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आणि मंडळ अधिकारी (सर्कल ऑफिसर) हे दोन दुवे थेट जनतेशी जोडलेले असून, त्यांना 'प्रशासनाचा कणा' म्हणून ओळखले जाते. शेतीविषयक नोंदींपासून ते विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीपर्यंत या अधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी असते. ही जबाबदारी पार पडत असताना दैनंदिन जीवनात शेतकरी बांधव, विविध प्रकारच्या नागरिक, महिला, कामानिमित्त संपर्क येत असतो तर हा संपर्क होत असताना नागरिकांच्या शंका समाधान आणि त्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी संवाद कौशल्य महत्वपूर्ण असून अंतरिक तळमळीने ग्रामीण जनतेला मार्गदर्शन आणि विविध शासकीय योजनेचा लाभ देण्यासाठी काम करावे. यासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्याचा अंगीकार करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या प्रशिक्षणातून अद्यावतंत्रज्ञानाचा वापर, विविध शासन निर्णय, नियमावली याचा अभ्यासही असणे आवश्यक आहे. तरच नागरिकांना आपण वेळेत सुविधा देऊ शकतो असे मार्गदर्शनात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

प्रशिक्षणातील मार्गदर्शक संजय कुंडेटकर यांनी महसूल विषयक विविध कायद्याचे मार्गदर्शन केले यामध्ये जमीन महसूल अधिनियम १९६६ यामधील खंड दोन, तीन आणि चार यामधील असणाऱ्या विविध बाबीचे सखोल मार्गदर्शन केले. तसेच वारसा हक्क, कायदे तुकडे बंदी, व यातील सुधारणा यावर मार्गदर्शन केले .

सेवा हमी विधेयक याबाबत सेवा हमी आयुक्त किरण जाधव यांनी नागरिकांना सेवा वेळेत उपलब्ध करून देण्याची विहित कालावधी होण्याच्या आत उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शन केले तसेच सेवा हमी विधेयकाच्या अंतर्गत होणाऱ्या अपील व अपील होऊ नये या संदर्भात महसूल अधिकारी यांना मार्गदर्शन केले.

डॉ. शोएब मोहम्मद डॉ. उल्फत परदेसी व मेघा सेवगन यांनी कर्मचाऱ्यांना आरोग्य विषयीचे मार्गदर्शन करून ताण-तणवाचे व्यवस्थापन करत असताना आपल्या आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे .याबाबत मार्गदर्शन करून आरोग्य विषयक विविध योजनांची माहिती या कार्यक्रमात दिली. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष गोरड उपविभागीय अधिकारी यांनी केले.

## अजित पवारांचा आणखी एक आमदार अडचणीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**अकोला/भंडारा** /उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आणखी एक आमदार न्यायालयीन अडचणीत सापडला आहे. भंडाऱ्याच्या तुमसर-मोहाडी मतदारसंघाचे आमदार राजू कारेमोरे यांना पोलिसांना शिवीगाळ केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे. मात्र, न्यायालयाने त्यांना दोन वर्षे शिस्तीत राहण्याची तंबी देत बंद पत्रकावर मुक्तता केली आहे.

भंडारा जिल्हा सत्र न्यायालयातील द्वितीय श्रेणीचे न्यायाधीश भारती काळे यांनी हा निकाल दिला. आमदार कारेमोरे यांच्यासह चार सहआरोपींना भारतीय दंड विधानाच्या कलम १४३, २९४ आणि ५०४ अंतर्गत दोषी ठरवण्यात आले असून कलम ३५३ अंतर्गत त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

न्यायालयाने नमूद केले की, आमदार राजू कारेमोरे हे लोकप्रतिनिधी असून समाजात त्यांची आणि सहआरोपींची वर्तणूक चांगली आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षांत कोणत्याही प्रकारचा वाद, भांडण किंवा कायद्याचे उल्लंघन न करता लोकप्रतिनिधीस शोभेल अशी वागणूक ठेवण्याच्या अटीवर त्यांची मुक्तता करण्यात आली.

दरम्यान, याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे मंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवल्याने त्यांचे मंत्रिपद आणि आमदारकी धोक्यात आली आहे. त्यामुळे एकीकडे कोकाटे प्रकरण, तर दुसरीकडे कारेमोरे यांच्यावरील निकालामुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीसाठी ही आणखी एक अडचण ठरली आहे.

**प्रकरण काय आहे?**

३१ डिसेंबर २०२१ रोजी आमदार राजू कारेमोरे यांचे मित्र यासीन छवारे व अन्य तीन जण वरठी येथून तुमसरकडे जात असताना मोहाडी-तुमसर मार्गावरील नगरपंचायत निवडणुकीच्या स्ट्राँगरूमजवळ पोलिसांनी त्यांची गाडी अडवली. पोलिसांनी मारहाण करून गाडीतील ५० लाख रुपये लुटल्याचा आरोप आमदार कारेमोरे यांनी केला होता.या घटनेनंतर संतप्त झालेले आमदार कारेमोरे यांनी मोहाडी पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांना अश्लील शिवीगाळ केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी ३ जानेवारी २०२२ रोजी आमदारांसह चार जणांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणाचा अंतिम निकाल आज न्यायालयाने दिला.

# मका खरेदी नोंदणी ऑनलाईन मुदतवाढ मिळावी : तहसीलदारांना निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी**/गंगापूर तालुक्यासह राज्यातील विविध भागांमध्ये यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर मका पिकाची लागवड केली आहे. मका हे अनेक शेतकऱ्यांचे प्रमुख नगदी पीक असून त्यावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. मात्र शासनाच्या शासकीय हमीभावाने मका खरेदीसाठी सुरू असलेल्या ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.सध्या सुरू असलेल्या नोंदणी प्रक्रियेदरम्यान ग्रामीण भागात इंटरनेट सेवा वारंवार खंडित होत असल्याने शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज भरताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक गावांमध्ये इंटरनेटचा वेग अत्यंत कमी असून काही ठिकाणी नेटवर्क उपलब्ध नसल्याने नोंदणी पूर्ण करणे शक्य होत नाही. यासोबतच सातबारा उतारे, पीक नोंदी, आधार संलग्नता तसेच इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत नसल्यानेही अनेक पात्र शेतकरी नोंदणीपासून वंचित राहिले आहेत.

याशिवाय नोंदणी प्रक्रियेबाबत पुरेशी माहिती व मार्गदर्शन न मिळाल्यामुळेही अनेक शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी केलेली नाही. काही शेतकऱ्यांना ऑनलाईन प्रक्रियेचे तांत्रिक ज्ञान नसल्याने त्यांना सेवा केंद्रांवर अवलंबून राहावे लागत आहे. मात्र सेवा केंद्रांवरही गर्दी असल्याने आणि मर्यादित वेळेमुळे सर्व शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण होऊ शकलेली नाही.

दरम्यान, मका खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीची सध्याची अंतिम मुदत संपल्याने अनेक पात्र शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नोंदणी न झाल्यास शेतकऱ्यांना शासकीय हमीभावाचा लाभ मिळणार नाही आणि त्यांना खासगी व्यापाऱ्यांकडे कमी दराने मका विकावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीला योग्य मोबदला मिळणार नसल्याची चिंता शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.



या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी प्रतिनिधी विशाल लांडगे यांनी गंगापूरचे तहसीलदार नवनाथ वगवाड यांना निवेदन देऊन मका शासकीय खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत तात्काळ वाढवण्याची ठाम मागणी केली आहे. शासनाने शेतकऱ्यांची सद्यस्थिती, तांत्रिक अडचणी आणि ग्रामीण भागातील वास्तव लक्षात घेऊन नोंदणीसाठी अतिरिक्त कालावधी द्यावा, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली.नोंदणीची मुदत वाढविल्यास जास्तीत जास्त शेतकऱ्यांना शासकीय हमीभावाचा लाभ मिळेल, शेतकऱ्यांचे संभाव्य आर्थिक नुकसान टळेल आणि मका उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, असे मत विशाल लांडगे यांनी व्यक्त केले. तसेच शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा शेतकरी वर्गात तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.तहसीलदार नवनाथ वगवाड यांनी निवेदन स्वीकारून शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत वरिष्ठ स्तरावर माहिती देण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचेही सांगण्यात येत आहे. आता शासनाकडून या मागणीवर काय निर्णय घेतला जातो, याकडे गंगापूर तालुक्यासह संपूर्ण राज्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

## संक्षिप्त

### शिल्पबाजारात हस्तशिल्पाचे प्रदर्शन व विक्री स्टॉल



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** विकास आयुक्त (हस्तशिल्प) कार्यालय, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्केटिंग सहाय्य व सेवा योजनेअंतर्गत प्रायोजित गांधी शिल्प बाजार (हस्तशिल्प प्रदर्शनी) चे आयोजन बलनाथ ग्रामीण विकास महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे. हा सात दिवसीय गांधी शिल्प बाजार दि.१६ ते २२ डिसेंबर २०२५ या कालावधीत पाटीदार भवन, जालना रोड येथे भरविण्यात आला आहे.

या प्रदर्शनीचे उद्घाटन गरवारे कम्युनिटी सेंटरचे उपाध्यक्ष अनिल भालेराव यांनी केले.तसेच न्यू इंडिया इन्शुरन्सचे मिलिंद दामोदरे विकास आयुक्त (हस्तशिल्प) कार्यालय, हस्तशिल्प सेवा केंद्र सहायक संचालक अमन कुमार जैन, भारत पर्यटन विभागाच्या सहायक संचालक मालती दत्ता, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली काडेरेकर उपस्थित होत्या.

गांधी शिल्प बाजारात पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, नवी दिल्ली व राजस्थान आदी विविध राज्यांतील हस्तशिल्प कारागीर सहभागी झाले असून त्यांनी आपल्या हस्तशिल्प वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीसाठी मांडणी केली आहे. तसेच विदर्भ विभाग आणि सोलापूर येथील विविध हातमाग विणकरही या उपक्रमाचा भाग आहेत.उद्घाटनप्रसंगी खंडेराव कला मंडळातर्फे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यात दिलीप खंडेराव व अजय शेंडगे यांनी सहभाग घेतला. इंडिया टुरिझम, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आयोजित या सांस्कृतिक सादरीकरणात मराठी लोकशैलीतील गणेश वंदना, कथक व ओडिसी नृत्य तसेच लावणीचा समावेश होता.

प्रदर्शनात कढाई काम, कांथा, ज्यूट शिल्प, चन्नापटना, लाकडी खेळणी, बनारसी साड्या, धातु शिल्प, बांबू शिल्प, जामदानी, सोलापूर सुती वॉल हँगिंग, जळगाव येथील धातु नक्षीकाम, राजस्थानची टाय-अँड-डाय, मध्य प्रदेश व पश्चिम बंगाल येथील कृत्रिम दागिने, मोजडी, अजंता पेंटिंग तसेच विविध चित्रकला शिल्पांचे प्रदर्शन करण्यात आले आहे. यामध्ये विदर्भातील विणकरांच्या हातमाग उत्पादनांचाही समावेश आहे.गांधी शिल्प बाजार हा कला प्रेमी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला असून दि.२२ डिसेंबर पर्यंत दररोज सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत पाटीदार भवन, जालना रोड येथे पाहण्यासाठी व खरेदीसाठी उपलब्ध आहे. या उपक्रमामार्फत हस्तशिल्प कारागीर व विणकरांना आपले कौशल्य सादर करण्याची व व्यवसाय रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

### कलम १६३ अंतर्गत मनाई आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** काही गट आणि विशेष करुन तृतीयपंथी एकट्याने किंवा एकत्रितपणे एकत्र येऊन लग्न, किंवा इतर धार्मिक प्रसंगी किंवा जन्म- मृत्यू इत्यादी ठिकाणी, सणासुदीच्या प्रसंगी किंवा विशिष्ट धार्मिक कार्यात किंवा कुटुंबातील जन्म-मृत्यू प्रसंगी जाऊन पैशांची मागणी करतात. तसेच रस्ते चौकात, रोडवर इ. विविध ठिकाणी फिरत आहेत. वाहनचालक आणि इतर जाणाऱ्या प्रवाशांना, नागरिकांना त्रास देऊन पैसे देण्यास भाग पाडत आहेत, याची पोलीस प्रशासनाचे गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारचे उपद्रव रोखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दि. १५ डिसेंबर ते दि.१४ फेब्रुवारी पर्यंत असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शस्त्र बाळगण्यास मनाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शस्त्र बाळगण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत पोलिस आयुक्त प्रविण पवार यांनी हा आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार शस्त्र परवाना धारकांनी शस्त्रे जमा करणे बंधनकारक असून आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अन्वये कारवाई करण्यात येणार आहे. संबंधित आदेश ३१ जानेवारी २०२६ पर्यंत लागू राहणार असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी केले आहे.

# शेतकऱ्याचं मरण

प्रयत्न करूनही काही प्रश्न जेव्हां सुटत नाहीत, तेव्हां त्यावर तात्पुरती उपाययोजना करून प्रश्न बाजूला सारावा लागतो. तात्पुरत्या उपाययोजना सुरू असतात, त्यातून बऱ्याचदा प्रश्नाची दखल घेतल्याचा दिलासाही मिळतो, पण मूळ जखम तशीच भळभळत राहते. तिचं दुःख कमी होत नाही. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न नेमका असाच झाला आहे. आत्महत्या थांबत नाहीत, त्यांची तीव्रताही कमी होत नाही. उपाययोजना म्हणून पॅकेज, व्यक्तिगत आर्थिक मदत, उत्तम बियाणं, खतांत सवलत-असं बरंच काही केलं गेलं. अडचणीतल्या शेतकऱ्याच्या मानसिक आधारासाठी तज्ज्ञांना घेऊन काही प्रयोगही केले गेले. बीड जिल्ह्यात 'मानवलोक'सारख्या संस्थेने 'आशाताई'सारख्या समुपदेशिका घडवल्या. प्रयोग यशस्वी झाले. काही आत्महत्या रोखल्या गेल्याही. पण, त्याने एकूण आत्महत्यांच्या प्रमाणात घट झाल्याचं दिसलं नाही. वेगवेगळ्या उपायांनंतरही त्यात फारसा फरक नाही. नागपूरला सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात गुरुवारी विधान परिषदेत सरकारकडून जी आकडेवारी दिली गेली, ती याचीच पुष्टी करणारी आहे. गेल्या नऊ महिन्यांत राज्यात ७८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सर्वात जास्त आत्महत्या विदर्भात, नागपूर विभागात( २९६) असून त्यानंतर मराठवाडा (२१२) आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवालात प्रसिद्ध झालेली आकडेवारी पाहिली, तर देशात शेतकऱ्यांच्या जितक्या आत्महत्या झाल्या, त्यातल्या ५० टक्के एकट्या महाराष्ट्रात आहेत. राज्यात एकूण ६ हजार ६६९ आत्महत्यांची नोंद आहे. त्यातल्या ४ हजार १५० आत्महत्या जमीन मालक शेतकऱ्यांच्या, तर २ हजार ५१९ भूमिहीन शेतमजुरांच्या आहेत. गेल्या चाळीसेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या ठळकपणे चर्चेत असून त्यात सुरुवातीपासूनच विदर्भ आणि मराठवाडा आघाडीवर आहे. विदर्भ-मराठवाड्यातील या दु:स्थितीच्या कारणांचा विविध अंगांनी अभ्यास केला गेला. त्यात शेतीतील अडचणींबरोबरच अन्य कौटुंबिक, सामाजिक कारणं-दबाव, चालीरीती यांचाही विचार झाला. त्यांचे निष्कर्ष आपल्यासमोर आहेत. ते सर्वमान्यही आहेत. पण, त्यातल्या एकेका कारणाला लक्ष्य करून त्यासाठी प्रबोधनात्मक कामाला म्हणावा तसा जोर लागल्याचं दिसत नाही. सरकारच्या औपचारिक यंत्रणांकडून यावर इलाज होईल, असं वाटत नाही.

शेतीतल्या अडचणींचा विचार करताना पूर्वी शेतमालाच्या बाजारभावाचा विषय सर्वप्रथम समोर यायचा. काही शेतमालांचे भाव आधारभूत किमतीच्या टेकूने सरकारला विशिष्ट पातळीवर सांभाळता येतात. पण, भाजीपाला किंवा फळांसारख्या नाशवंत मालासाठी हे शक्य होत नाही. ज्या मालाला आधारभूत किमतीचा थोडाबहुत उपाय आहे, तिथेही मालाचा अपेक्षित दर्जा आणि यंत्रणेतल्या गैरव्यवहारांचे अडथळे आहेतच. त्यामुळे, जिथे बाजारभावाची शाश्वती देता येत नाही, तिथे शेतीतील गुंतवणुकीचा खर्च कमी करण्यासाठी मदत देऊन झाली. पण, त्याचाही काही उपयोग झालेला दिसत नाही. मानवनिर्मित कारणं दूर करण्याचा किंवा बाजार व्यवस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या समस्यांना उत्तरं शोधण्याचा प्रयत्न गेली अनेक वर्षं सुरू असूनही त्याला यश येत नसताना आता माणसाच्या नियंत्रणापलीकडच्या बाबींची शेतीवर आक्रमणं सुरू झाली आहेत. गेली काही वर्षं महाराष्ट्राला एकाच वेळी दुष्काळ आणि अतिवृष्टी या दोन्ही नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावं लागतं आहे. वातावरणीय बदलांचा हा परिणाम आहे. जगात ज्या देशांना वातावरणीय बदलांच्या दुष्परिणामांना सामोरं जावं लागतं आहे, त्यात भारत नवव्या क्रमांकावर आहे! गेली काही वर्षं हिमालयापासून केरळपर्यंत आणि पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत ढगफुटी, चक्रीवादळांचा रतीब सुरू आहे. किनारपट्टीवरच्या शेतीबरोबरच मच्छीमारांचं मोठं नुकसान होतं आहे. जगातल्या तीन अब्जांपेक्षा जास्त लोकसंख्या (सुमारे ४० टक्के) गेली ३० वर्षं तीव्र वातावरणीय बदलांनी वारंवार उद्ध्वस्त होते आहे. ही लोकसंख्या ज्या अकरा देशांत आहे, त्यातच भारत नववा आहे. कृषीप्रधान भारताला या अस्थिर वातावरणाचा विचार करून आपल्या कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल करावे लागणार आहेत. त्याची जाणीव आपल्याकडे आता दिसू लागली आहेत. धोरणात्मक पातळीवर त्याच्या पर्यायांची भाषा बोलली जाऊ लागली आहे. केवळ चर्चेत न ठेवता याबाबतच्या उपाययोजना लवकर प्रत्यक्ष आणल्या नाहीत, तर येत्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आकडा भयावह होण्याची भीती आहे.

महाराष्ट्रातल्या शेतीवर आणखी एक गंभीर संकट आलं आहे. ते आहे, वन्य प्राण्यांचं. चर्चा जरी हिंस्र प्राण्यांची होत असली, तरी खरं संकट वन्य प्राण्यांचंच आहे. त्याची जाणीव अजून महाराष्ट्राला तितकीशी दिसत नाही. कोकण आणि गडचिरोलीत हत्ती; रानडुक्करं, माकडं, हरणं, निलगाई शेतीचं मोठं नुकसान करत आहेत. कोल्हे, लांडगे, मुंगूस, साळींदरं गावागावांत सर्रास दिसू लागली आहेत. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हरणं, काळवीटं, सांबरांनी शेतीची वाट लावली आहे. मोर, उंदीर, अस्वलं, पक्षांचे थवे राज्याच्या वेगवेगळ्या भागांत शेतात हैदोस घालत आहेत. या सगळ्याच्या परिणामी यानंतर विशिष्ट कीटक, किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत. चर्चा फक्त बिबट्यांची आहे. पण जंगलं साफ केल्यामुळे ही सगळी वन्य मंडळी शेतात उतरली आहेत. त्यांनीही शेतकरी कावला आहे. उद्याच्या आत्महत्यांना ही नवी कारणंही कारणीभूत ठरतील, इतकी ती गंभीर आहेत. उद्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्याची गांभीर्याने आजच दखल घेतली पाहिजे.

# नायलॉन मांजराच्या बाबतीत पोलिस प्रशासन सज्ज;जनतेनेही तत्परता दाखवावी

नायलॉन मांजाच्या बाबतीत सर्वांचेच सहकार्य आवश्यक आहे. तेव्हाच यावर अंकुश लावता येईल.यावर्षी सुध्दा मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्रात नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीवर बंदी आहेच.तरीही आतापासूनच नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीला सुरूवात झाल्याचे दिसून येते.याच अनुषंगाने नागपूरसह राज्याच्या अनेक भागात पोलिस प्रशासनाने नायलॉन मांजा खरेदी-विक्री करणाऱ्यांच्या मुस्क्या आवळायला सुरूवात केली व लाखो रुपयांचा मांजा जप्त करण्यात येत आहे.याकरीता पोलिस विभागाची जेवढी प्रशंसा कराल तेवढी कमी आहे.कारण मकरसंक्रांतीला एक महिना वेळ आहे तरीही आतापासून नायलॉन मांजाधारी पतंगीच्या मैदानात उतरले आहेत त्याच पध्दतीने पोलिस विभागाने आपल्या कायद्याची धार मजबुत करून लाखोंचा मांजा पकडल्याचे दिसून येते.नागपूरात सर्वाधिक नायलॉन मांजाची आवक अवैध पध्दतीने उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते आणि येथुनच महाराष्ट्राती अनेक भागांत पुरवठा केला जात असावा.म्हणजेच नायलॉन मांजा धोका अजुनपर्यंत संपलेला नाही. त्यामुळे नायलॉन मांजावर बंदी असुन सुद्धा विक्री होवू शकते याला नाकारता येत नाही. याचे जिवंत उदाहरण सर्वांसमोर आहेच.नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्षांसाठी जीवघेना व घातक आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा बहिष्कार सर्वच स्तरातून होने अत्यंत गरजेचे आहे.संक्रांत म्हटली की पतंग आलीच पतंगी शिवाय संक्रांत अधुरी असल्याचे लहान मोठ्याना वाटत असते. परंतु काही नागरिक व मुलं यांनी जर चुकीचा मार्ग अवलंबवीला किंवा निष्काळजीपणा केली तर मोठ्या प्रमाणात जिवीत हानी होवू शकते याला नाकारता येत नाही. नायलॉन मांजाच्या बंदीबद्दल गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक संघटना, संस्था,पोलिस प्रशासन, सोशल मीडिया, वृत्तपत्रे यांनी नेहमीच आवाज उचलत आहे आणि गेल्या १० वर्षात अनेक दुर्घटना होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत हानीसुध्दा झाल्याचे सर्वांनाच ग्यात आहे.यात काहींना आपला प्राण सुध्दा गमवावा लागला. कायद्याच्या माध्यमातून मागील सहा वर्षापासून नायलॉन मांजावर पुर्णतः बंदी घालण्यात आली आहे.तरीही राज्यात सध्याच्या परिस्थितीत नायलॉन मांजा विक्रीला येण्याची चिन्हे दिसत आहेत. मागील वर्षी नायलॉन मांजामुळे नागपुरमध्ये ४०० हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात व पशुपक्षांच्या ७०० हुन अधिक दुर्घटना झाल्याचे निदर्शनास आले.यावरून आपण समजू शकतो की संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला आणखी कीतीतरी भयावह घटना झाल्या असाव्यात. त्याचप्रमाणे मागीलवर्षी गुजरातमध्ये पतंगबाजीमध्ये ८०० हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात यात छतावरून पडुन १०० हुन अधिक घायल झालेत व १० पेक्षा जास्त जनांचा मांजाणे गळा कापुन मृत्यू झाला अशा भयानक घटना नायलॉन मांजामुळे राज्यासह देशातील वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या आहेत.म्हणजेच यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रातील नायलॉन मांजाच्या दुर्घटना कमी न होता वाढतच आहे.त्यामुळे पतंगीच्या नादात जीवीत हाणी केव्हाही ओढावु शकते याला नाकारता येत नाही.त्यामुळे सावधगिरीचे उपाय म्हणून घरातील परिवाराने व मुख्यत्वे करून पालकांनी डोळ्यात तेल घालून मुलांवर करडी नजर ठेवण्याची गरज आहे.कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यॐ रिता नायलॉन मांजाचा बहिष्कार अत्यंत आवश्यक आहे.या भयानक घटनेमुळे नायलॉन मांजाला जिवघेना मांजाच म्हणावा लागेल.भारतात अनेक भागात नायलॉन मांजामुळे मानवी व पशुपक्षांच्या हजारो दुर्घटना दरवर्षी होत असतात. एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर विजेचे तार एकमेकांवर आदळतात व त्याचा स्पार्क होतो अशा वेळेस पतंग उडविणाऱ्याला कदाचित आपला प्राणसुध्दा गमवावा लागतो.त्यामुळे मी सर्व पतंग शौकीनांना विनंती करेल की नायलॉन मांजाला टाटा बाय बायकरून कॉटनच्या धाग्याने पतंग उडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.सर्वांना माहीत आहे की दरवर्षी नायलॉन मांजामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी, मोठ्या प्रमाणात दुर्घटना व वेळप्रसंगी यात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागतात.त्याच प्रमाणे अनेक पशु - पक्षांनासुध्दा आपले प्राण गमवावे लागतात.पक्षांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती अत्यंत गंभीर,भयावह व बिकट आहे. कारण आज वाढत्या प्रदूषणामुळे त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे. पक्षांना हवेत जास्त वेळ रहावे लागते. त्यामुळे त्यांना प्रदुषणाचा व आता नायलॉन मांजाचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागतो आहे .संक्रांतीच्या शुभपर्वावर नायलॉन मांजामुळे पक्षांची जिवीत हानी होणार नाही याची काळजी व जबाबदारी आतापासूनच जनतेने घ्यावी.पोलिस विभाग याबाबत सतर्कता बाळगुन लाखो रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करून योग्य कारवाई करीत आहे. परंतु जनतेनीही पोलिस विभागाला संपूर्ण सहकार्य केले पाहिजे.नायलॉन मांजा हा मांजा नसुन जहरीली तलवारआहे कारण आपला किंवा पक्षांचा गळा कळत न कळत केंव्हाही कापु शकते.मागील वर्षी अनेकांचा मांजराने गळा कापल्या गेला यात ते गंभीर जख्मीसुध्दा झालेत.त्यामुळे पतंग उडविताना सावधगिरीने पतंग उडवावी व नायलॉन मांजाचा बहिष्कारकरावा.पतंग उडवा परंतु जीवाशी खेळु नका यातच सर्वांचा आनंद आहे. कारण छोटीशी चूक मोठी दुर्घटना ओढावू शकते याला नाकारता येत नाही. संक्रांतीचा आनंद अवश्य घ्यावा! परंतु जिवावर बितण्यालायक कोणतेही कृत्य होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी.यातच सर्वांचा आनंद आहे.कायदा व पोलीस विभाग आपले कार्य मोठ्या शिताफीने आणि ताकदीनिशी करीत आहे.परंतु आपणच तटस्थ रहालो तर नायलॉन मांजावर अवश्य मात करू शकतो याला नाकारता येत नाही.सध्याच्या अत्याधुनिक युगात नायलॉन मांजाची विक्री ऑनलाईनेसुध्दा होवू शकते.मकरसंक्रांतीच्या पाश्र्वभूमीवर प्रशासन आतापासूनच प्लास्टिक पतंग आणि नायलॉन मांजा जप्तीची कारवाई युद्ध पातळीवर करीत आहे यात शंका नाही.सरकारने ऑनलाईन नायलॉन मांजावरील विक्रीवर बंदी आणायला हवी.अशा कठीण परीस्थितीत नायलॉन मांजाला रोखण्यासाठी प्रशासनापेक्षा समाजाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.तेव्हाच नायलॉन मांजा हद्दपार होवु शकतो. याकरिता प्रशासन व आमजनता यांच्यात समन्वय असने गरजेचे आहे. यावर सरकारने जातीने लक्ष दीले पाहिजे व जनतेनीसुध्दा यावर लक्ष ठेवण्याची अत्यंत गरज आहे. पालकांनी आतापासूनच आपल्या मुलांना नायलॉन मांजा पासुन दुर ठेवण्याचा काटेकोरपणे प्रयत्न करावा व नायलॉन मांजराचे दुष्परिणाम समजून सांगावे.सरकार व पोलीस विभाग यावर लक्ष ठेवुन आहेच.परंतु नागरिकांचेसुध्दा कर्तव्य आहे की जी वस्तु घातक आणि जिवघेनीआहे आणि ती आपण रोखु शकतो ती रोखलीच पाहिजे.यामुळे अपघातावर आळा बसेल व पशुपक्षांचे प्राण वाचतीलपतंगीचा आनंद भरपूर घ्या. परंतु नायलॉन मांजाला हद्दपारकरा. नायलॉन मांजा बद्दल नागरिक सतर्क रहाले तर नायलॉन मांजराची विक्री होणारच नाही व प्रशासनाला कारवाईची गरजसुध्दा भासणार नाही. त्यामुळे नागरिकांनी सर्वप्रथम सतर्क रहाने गरजेचे आहे. नायलॉन मांजामुळे होणारे अपघात सांगुन येत नाही ते केंव्हाही कधीही होवु शकतात. त्यामुळे नायलॉन मांजाला रोखण्याचे काम सर्वप्रथम नागरिकांचे आहे,मग प्रशासनाचे राहील. सावधगिरीचे उपाय म्हणुन मी सांगू इच्छितो की मुलांनी कटलेल्या पतंगीच्या मागे धावु नये,वाहन चालकांनी कटलेल्या पतंगीच्या धाग्यापासुन सावधानी बाळगावी, घरून निघताना गळ्याला दुपट्टा बांधावा.सर्व अपघात टाळा मानव व संपूर्ण प्राणीमात्रांचे प्राण वाचवा.जय हिंद!

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**

# मान सन्मानापेक्षा मोठा?

मान........ आजच्या काळात मानाला किंमत दिसत नाही. माणूसकी हरवली आहे. लोकांना कुणाशी बोलायला वेळ नाही. संवादही हरवला आहे. त्यातच मानाची जागा सन्मानानं घेतलेली आहे. तसं पाहिल्यास आज मोठ्या प्रमाणावर सन्मानाला किंमत आलेली आहे.सन्मान व मान हे व्यक्तीचे गुण पाहून पुर्वी दिल्या जात होते. आता सन्मान व मान हे त्या व्यक्तीचा चापलूसपणा, त्यांचा पैसा पाहून दिल्या जातो. जर ते व्यक्ती धनवान असतील तर त्यांना आज समाजात मान मिळतो. जर ते गोडगोड बोलत असतील तर त्यांना मान मिळतो. अलिकडील काळात सन्मान हा बाजारातून विकत घेतला जातो. मात्र मान हा कोणत्याच बाजारात विकत मिळत नाही.

मान व सन्मान. काय आहे नेमकं मान आणि सन्मान. कोणी या दोन्ही शब्दाचा अर्थ एकच घेतात व लावतातही. मात्र हे दोन शब्द जसे एकच आहेत. फक्त थोडासा फरक आहे. तसेच याचे अर्थही भिन्न भिन्न नाहीत.

मानाचाही अर्थ किंमतच होते आणि सन्मानाचाही अर्थ किंमतच होते. मग मान आणि सन्मानात थोडासा फरक कसा? ही विचार करायला लावणारी बाब आहे. अलिकडील काळात लोकं सन्मान पाहतात. सन्मान हा कोणाचाही होतो. ज्या व्यक्तीघटकात माणूसकी नसते तरीही. तो चापलूस असतो, त्याचाच आजच्या काळात सन्मान होतांना दिसतो. तसा मानाचा अर्थ नाही. मान हा त्याच व्यक्तीचा होतो. ज्यांचेमध्ये माणूसकी असते. जी प्रक्रिया सहज घडते. जी प्रक्रिया नैसर्गिक आहे. सन्मानामध्ये कुत्रीमता आहे तर मानामध्ये कुत्रीमता नाही. बस एवढाच किरकोळ फरक.

पुर्वी सन्मानाचा अर्थ वेगळा होता. सन्मान त्या व्यक्तीचा करण्यात येत असे. जो व्यक्ती आदराचा असायचा. ज्याची कामगिरी चांगली असायची. म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या चांगल्या गुणांमुळे, कर्तृत्वामुळे किंवा प्रतिष्ठेमुळे मिळणारा आदर, गौरव म्हणजे सन्मान समजला जाई तर मानाला नैसर्गिक समजलं जाई. परंतु अलिकडील काळात मानालाही लोकं कुत्रीमच समजू लागले आहेत. परंतु तसं घडत नाही. म्हणजे मानातही सन्मानासारखाच आदर, प्रतिष्ठा असायचीच. पण तो अनेकदा चांगल्या स्वभावामुळे किंवा वागणुकीमुळे नैसर्गिकरित्या मिळत असे आणि तो एखाद्या व्यक्तीची उच्च अवस्था किंवा दर्जा दर्शवीत असे. तो गुणवत्तेतून मिळत असे आणि सन्मान हा कृतीतून मिळत असे.

आज सन्मालालाच महत्व प्राप्त झालेले दिसते. लोकं घरीच बसून प्रमाणपत्र पोष्ट करीत असतात. त्यातच असे प्रमाणपत्र हे काही स्वरुपात फर्जी देखील असतात. सन्मानासाठी आज लोकं वशिला लावतात वा पैसा खर्च करतात. आजचे काही सन्मान हे मी तुला देतो. तू मला दे. अशा स्वरुपाचे असतात. अर्थातच आजच्या काळातील सन्मानातून व्यक्तीची चांगली कामगिरी दिसून येत नाही. आजच्या काळातील सन्मानात मी तुला देतो आणि तू मला दे, याचा अर्थ मी तुला प्रशस्तीपत्र देतो. फ

बक्षीस देतो. त्यानंतर कालांतरानं तू मला प्रशस्तीपत्र दे. बक्षीस दे. असा त्याचा अर्थ होतो किंवा मी तुला हजार रुपये देतो. तू मला पाचशे रुपयाचा सन्मान अर्थात प्रशस्तीपत्र दे. अर्थात उरलेले पाचशे रुपये तुझ्यासाठीच ठेवून दे. असा त्याचा अर्थ होतो.

सन्मान...... सन्मानाबद्दल अधिक सांगायचं म्हणजे देशासाठी केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल सैनिकाला सन्मान देण्यात येतो. कारण सैनिकांचं कार्य उत्तमच असतं. तो सीमेवर दिवसरात्र स्वतःच्या डोळ्यावर ताबा ठेवून जागतो. म्हणूनच जनता सुरक्षीत असते व मोकळा श्वास घेवू शकते. त्यातच आपण जसा त्याला सन्मान देतो. तसाच आपण त्यांचा मानही करतो. कारण आपल्याला कळतंय की ते आहेत. म्हणूनच आपण देशात राजरोषपणे बोलू शकतो. वावरु शकतो. तसं एखाद्या नेत्याच्या बाबतीत घडत नाही. नेत्यांचा प्रत्येकच विचारपीठावर सन्मान होतो. त्याला मानही मिळतो. परंतु तो मान त्याला त्याच्या पुढ्यात मिळतो. मागं त्याला लोकं शिव्याच हासडतात. तसं सैनिकांच्या बाबत घडत नाही. त्यांच्या बाबतीत सन्मान म्हणजे चांगल्या कार्याबद्दल, शौर्य किंवा प्रामाणिकपणासारख्या गुणांसाठी मिळणारी मान्यता.

मान...... याचा अर्थ आदर, प्रतिष्ठा, किंमत, योग्यता. व्यक्तीच्या चांगल्या स्वभावामुळे त्यांना समाजात खूप मान आहे. असं आपलं म्हणणं. व्यक्तीच्या आंतरिक गुणांमुळे, चांगल्या वागणुकीमुळे आपोआप मिळणारी प्रतिष्ठा किंवा दर्जा, हा सन्मानापेक्षा अधिक नैसर्गिक आणि व्यक्तिगत असू शकतो. सन्मान हा सहसा एखाद्या कृती किंवा कामगिरीसाठी दिला जातो. उदा. सत्कार करणे तर मान हा व्यक्तीच्या चारित्र्यामुळे आणि स्वभावामुळे नैसर्गिकरित्या मिळतो. सन्मान हा अधिक बाह्य आणि कृती-आधारीत असू शकतो तर मान हा व्यक्तीच्या आंतरिक गुणवत्तेतून येतो.

आज लोकं घरीच बसून सन्मान प्राप्त करीत असतात. परंतु तो मान नसतोच. याबाबतीत एक उदाहरण देतो. समजा मी एखाद्या व्यक्तीला भेटायला त्याच्या घरी गेलो. एखादं महत्वाचं काम असेल तर...... तसा मी फार दूरुन गाडीचं पेट्रोल खर्च करुन गेलो. अन् तसा तो दिसला आणि मला पाहताच तो आतमध्ये गेला. त्यातच त्याच्या पत्नीनं सांगीतलं की ज्याला मला भेटायचंय. तो व्यक्ती घरी नाही, झोपला आहे, नंतर याल. तर तो मला मिळालेला मान नाही.

कारण संबधीत व्यक्ती घरीच आहे. त्याला मला भेटायची इच्छा नाही. यातून दोन अर्थ निघतात. एक म्हणजे तो माणूसकीचा नाही किंवा त्याचं घर, परीवार माणूसकीचं नाही की ते दुरुन येणाऱ्या व्यक्तीलाही किंमत देत नाही. अन् दुसरं म्हणजे मी त्यांना माणूसकीचा न वाटणे. जेणेकरुन ती मंडळी मला भेटायचं टाळतात. यालाच म्हणतात मान. जर मी दिसताच संबंधीत व्यक्तीच्या घरी माझं आगत स्वागत झालं असतं तर त्याला मान समजलं गेलं असतं. याचाच अर्थ असा की मान हा नैसर्गिक असतो तर सन्मान हा कुत्रीम असतो. मान हा जास्त दिवस टिकतो तर सन्मान हा क्षणिक असतो. तो जास्त दिवस टिकत नाही. परंतु दिवास्वप्न नक्कीच दाखवतो.

विशेष सांगायचं झाल्यास आजचा काळ हा असाच आहे. आज मानावर कुत्रीमतेचा साज चढवला जात असून ज्यांच्यात काहीच दम नाही. ज्यांचं काहीच कार्य नाही. त्यांचा आज सन्मान होतोय. ज्याला मान म्हणता येत नाही. मान हा माणूस संपून जाईल, मरण पावेल तरी टिकतो आणि सन्मान हा फक्त आयुष्याच्या काही काळापर्यंत.


ज्यावेळेस माणूस मरतो आणि त्याला मिळालेले सन्मान जर खोट्या स्वरुपाचे असतील तर कोणीच त्याचा सन्मान राखून ठेवत नाहीत. लोकं त्याला विसरतात. परंतु काही लोकं असेही असतात की जे माणसाच्या मरणानंतरही संबंधीत व्यक्तींची देवासारखी पुजा करतात. नकळत आपले त्या व्यक्तींहमोर हात जोडले जातात. तोच व्यक्ती मानाचा ठरतो. तोच खरा सन्मान असतो. कारण त्यानं केलेलं कार्य उत्तम प्रकारचं असतं.

महत्वाचं सांगायचं झाल्यास माणसानं सन्मानाच्या मागं फिरु नये. मानाच्या मागे फिरावं. लोकांनी सन्मान द्यावा हा विचार करु नये तर लोकांनी मान द्यावा याचाच विचार करावा. जेणेकरुन तोच मान असेल व सन्मानही असेल. त्यासाठी कार्य करावे. चांगले कार्य करावे. तसाच आपला स्वभावगुण चांगला ठेवावा. त्यातच आपले चारित्र्य चांगले ठेवावे.

कारण ज्याचा आजच्या काळात मान केला जाईल. त्यालाच सन्मानही सहज प्राप्त होईल. कारण मान ही गोष्ट सारस्वत जीवंत असणारी प्रक्रिया आहे. सन्मानासारखी काही दिवसच चालणारी प्रक्रिया नाही. हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे, नागपूर**

# प्रयत्नवादाला स्वीकारा



लहानशा गोष्टी, मोठा अर्थ : शिल्पा अष्टमकर

केल्याने होत आहे रे।
आधी केलेची पाहिजे।
यत्न तो देव जाणावा।
अंतरी धरतां बरे।
अचूक यत्न तो देव।
चुकणे दैत्य जाणिजे।
न्याय तो दैत्य जाणावा।
अन्याये राक्षसी क्रिया।।

मी विवेकानंद म्हणतात, ज्याचा देवावर विश्वास नाही तो नास्तिक आहे असा आपला जुना धर्म सांगतो; परंतु धर्मविषयक नवीन व्याख्येनुसार ज्याचा स्वत:वर विश्वास नाही तोच नास्तिक होय... जगात ३३ कोटी देवांवर विश्वास नसेल तर काही हरकत नाही; पण जर स्वतःवर विश्वास नसेल तर तुम्ही नास्तिकच आहात.

मानवी जीवनाचे महान रहस्य स्वामीजींनी येथे सांगितले आहे. हीच गोष्ट समर्थांनी वरील ओव्यांत सांगितली आहे. ज्याला काम करायचे नसते तो आरंभापासून अनेक शंका-कुशंका काढतो आणि आळशासारखा पडून राहतो.

हेलन केलर ही जन्मत:च आंधळी, मुकी आणि बहिरी होती. केवळ स्पर्शाच्या सहाय्याने ती एम.ए.पर्यंत शिकली व आपल्यासारख्या बहिऱ्या, आंधळ्या मुलींसाठी तिने शाळा सुरू केली. यशवंतराव चव्हाण अत्यंत गरीब कुटुंबात जन्मलेले. त्यांना सर्व मुले 'येशा' म्हणत. त्यांना वाईट वाटे. एकदा वर्गात पर्यवेक्षक आले. त्यांनी प्रत्येक मुलाला एक प्रश्न विचारला, तू मोठेपणी कोण होणार? जेव्हा यशवंताला हा प्रश्न विचारला तेव्हा हा मुलगा म्हणाला,-' मि यशवंत राव चव्हाण होणार. 'या मुलाने आयुष्यभर प्रयत्नवादाची कास धरली. अनेक महान गोष्टी केल्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, लोकांसाठी आयुष्य वाहिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात की, आपल्या प्रयत्नांनी, आपल्या प्रगतीची दिशा ठरवली पाहिजे. ज्ञान मिळण्याचे साधन पुस्तकात मिळणार नाही. परिश्रम करून खऱ्या अर्थाने नीट समजण्याचे काम आहे. अशक्य काहीही नाही, हेच त्यांनी शिकवलं. मानवी जीवनात यश-अपयशाची वाटचाल अपरिहार्य आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात संधी, संघर्ष, चढ-उतार येतच असतात; परंतु या सर्वांवर मात करण्याची खरी किल्ली एका तत्त्वात दडलेली आहे प्रयत्नवाद. म्हणजेच परिस्थिती कोणतीही असो, मनुष्याने सतत प्रयत्न करत राहणे, हार न मानणे आणि प्रगतीसाठी सकारात्मक धडपड करत राहणे.

१. प्रयत्नवाद का आवश्यक आहे?

प्रयत्न हा माणसाच्या प्रगतीचा पाया आहे. यश नेहमी एका दिवसात मिळत नाही. तो सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिणाम असतो. अपयश आले तरी प्रयत्न सोडले, तर विकास थांबतो. पण अपयशानंतरही प्रयत्न सुरू ठेवले, तर तेच अपयश भविष्यातील यशाची पायाभरणी करते.

२. प्रयत्नवादी विचारसरणीचे फायदे -

मनावरचा ताण कमी होतो कारण आपण परिणामाऐवजी प्रक्रियेला महत्त्व देतो. आत्मविश्वास वाढतो. प्रत्येक छोट्या प्रयत्नातून अनुभव मिळतो. आव्हाने सहज वाटू लागतात कारण त्यांचा सामना करण्याची सवय तयार होते. समस्यांकडे नकारात्मक न बघता समाधान केंद्रित दृष्टिकोन वाढतो.

३. 'प्रयत्न' आणि 'यश' यांचा संबंध

यश आपोआप येत नाही; प्रयत्नांच्या खडतर वाटेवरून चालतच ते गाठता येते. जिद्द, चिकाटी आणि मेहनत यांच्या आधारेच लक्ष्य साध्य होते. ज्यांनी महान कार्य केले ते देखील सामान्यच होते पण त्यांची असामान्यता त्यांच्या निरंतर प्रयत्नांत होती.

४. प्रयत्नवाद स्वीकारण्यासाठी काही मार्गदर्शक टिप्स -

काम लहान-लहान टप्प्यात विभागा आणि प्रत्येक टप्पा पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. चुका झाल्या तरी त्यातून शिका, स्वतःला दोष देऊ नका. सकारात्मक लोकांच्या सहवासात राहा. दररोज स्वतःला एक प्रश्न विचारा - आज मी माझ्या ध्येयासाठी काय प्रयत्न केले? हार न मानता एक पाऊल पुढे टाकत राहा.

जीवनात हमखास येणाऱ्या अडथळ्यांवर मात करण्यासाठी प्रयत्नवाद हेच सर्वात प्रभावी तत्त्व आहे. प्रयत्न करत राहणे हीच मोठी जिंक आहे. कारण प्रयत्न करणारा कधीच हरत नाही - तो शिकतो, वाढतो आणि अखेर यशाकडे वाटचाल करतो. म्हणूनच, परिस्थिती काहीही असो, प्रयत्नवादाला स्वीकारा आणि आपल्या आयुष्याला सकारात्मक दिशादर्शन करा.

# संक्षिप्त

## आराध्याची २५ दिवसांपासून मृत्यूशी सुरु असलेली झुंज अखेर अपयशी

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर/ प्रतिनिधी** / वैजापूर तालुक्यातील धोंदलगाव येथील कु आराध्या भगवान चौधरी हिचा (दि.१४) रविवारी रात्री मुंबई येथील एका खासगी हॉस्पीटलमध्ये उपचारा सुरु असतांना मृत्युशी सुरू असलेली झुंज अपयशी ठरली.खेळण्या बागडण्याचे वय असलेल्या दहा वर्षीय आराध्याला काही दीवसांपूर्वी यकृताचा गंभीर आजार जडला होता.



त्यामुळे तिला मुंबई येथील एका खासगी रूग्नालयात दाखल करण्यात आले होते.डॉक्टरांनी यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रीया करण्याचा सल्ला दिला होता. त्यासाठी विस लाख रुपये खर्च सांगण्यात आला. मात्र आई-वडीलांची परीस्थीती हलाखीची असल्याने उपचाराचा खर्च कुठून आणायचा असा प्रश्न उपस्थीत झाला.परंतु हि वार्ता सोशल मिडीया व विविध दैनिकांमध्ये प्रसिध्द झाल्यानंतर आराध्याच्या उपचारासाठी मदतीचा ओघ सुरु झाला.दानशुर व्यक्तींनी फोन पे च्या माध्यमातुन आराध्याच्या वडीलांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न केला मात्र नियतीच्या मनात वेगळेच काही होते.तब्बल पंचविस दिवस मृत्युशी झुंज देत असलेल्या आराध्याने रविवारी रात्री या जगाचा निरोप घेतला. आराध्याच्या आई-वडीलांनी फुट-पाथवर झोपून तिच्या उपचारासाठी जिवाचे रान केले होते परंतु त्यांनी लेकीच्या प्रेमापोटी केलेले प्रयत्न शेवटी असफल झाले.अन् चौधरी परीवार शोक सागरात बुडाला एकुलती एक मुलगी सोडून गेल्याने आई-वडीलांनी हंबरडा फोडला होता.आराध्याचे पार्थीव मुंबईहुन धोंदलगावात येताच संपूर्ण धोंदलगाव नगरी शोक सागरात बुडाली. होती.अखेर सोमवारी सकाळी आराध्यावर धोंदलगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.गावकरी तसेच नातेवाईकांनी अश्रु ढाळत आराध्याला शेवटचा निरोप दिला.आराध्याच्या पश्चात आई-वडील व एक भाऊ असा परीवार आहे.

## जवखेडा बु.येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी**/ कन्नड तालुक्यातील राशेश्वर महादेव मंदिर जवखेडा बु. येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता भक्तिभावपूर्ण व उत्साहाच्या वातावरणात पार पडली. सांगता प्रसंगी कीर्तनकार ह. भ. प. महादेव महाराज निपाणीकर यांनी आपल्या ओघवत्या, रसाळ वाणीतून श्रीकृष्णाच्या चरित्राचे भावस्पर्शी वर्णन करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.

कीर्तनादरम्यान महाराजांनी श्रीकृष्णाच्या बाललीला, गोकुळातील संस्कार, भगवद्गीतेतील कर्मयोगाचा संदेश तसेच समाजहितासाठी दिलेल्या आदर्श विचारांचा सविस्तर ऊहापोह केला. श्रीकृष्णाचे चरित्र हे केवळ धार्मिक नाही, तर आजच्या पिढीसाठी जीवन जगण्याची दिशा देणारे आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी महाराजांनी विशेषतः नवतरुणांना उद्देशून व्यसनमुक्त जीवन, आई-वडिलांचा आदर, गुरुसेवा, परिश्रम व चारित्र्यसंपन्न जीवनशैली अंगीकारण्याची नवी संकल्पना मांडली. आधुनिक धावपळीच्या युगातही संतपरंपरेचे संस्कार टिकवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अखंड हरिनाम सप्ताहाच्या कालावधीत परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. हरिनामाच्या गजराने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. सांगता कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या भक्तिमय सप्ताहास विविध क्षेत्रांतील मान्यवर व नेतेमंडळींनी, संत मंडळी यांनी सदिच्छा भेट देत कार्यक्रमाचे कौतुक केले.



त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. ग्रामस्थ, भाविक व सप्ताह आयोजन समितीच्या सहकार्यामुळे हा सप्ताह यशस्वीरीत्या पार पडला.या अखंड हरिनाम सप्ताहामुळे गावात आध्यात्मिक वातावरण निर्माण होऊन समाजात सद्भावना व सकारात्मक परिवर्तन घडण्यास निश्चितच हातभार लागेल, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केले. छायाचित्र सुनिल निकम दैनिक आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी.

# ऑनलाईन कामकाजावर तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांचा नकार

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी**/ उदय कुलकर्णी/ तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांनी ऑनलाईन संगणकीकृत कामकाजास नकार दिला असून, याबाबतचे निवेदन त्यांनी नायब तहसीलदार प्रशांत काळे यांना सादर केले आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्राम महसूल व मंडळ अधिकाऱ्यांना ऑनलाईन कामकाजासाठी पुरविण्यात आलेले लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर आदी संगणकीय साहित्य सध्या अत्यंत मोडकळीस आले आहे. ही उपकरणे वापरण्यायोग्य नसून त्यांची अवस्था 'घात नसून खोळंबा' अशी झाली आहे. त्यामुळे ई-पिक पाहणी मंजुरी व्यतिरिक्त इतर कोणतीही कामे या प्रणालीद्वारे होत नाहीत. याच कामात संपूर्ण वेळ खर्च होत असल्याने अन्य जबाबदाऱ्या देऊ नयेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

तलाठी संघटनेने यापूर्वी विविध मागण्या मांडल्या होत्या. मात्र, त्यांच्या पूर्ततेसाठी जमावबंदी आयुक्तांनी अद्याप कोणताही आदेश निर्गमित केलेला नाही. त्यामुळे तलाठी संघटनेच्या निर्णयानुसार सोमवार, दि. १५ डिसेंबर पासून ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांनी ऑनलाईन कामकाजास नकार देत सर्व संगणकीय उपकरणे तहसील कार्यालयात जमा केली आहेत.

या निवेदनावर तालुका तलाठी संघाचे अध्यक्ष श्री. बाळू घटे, उपाध्यक्षा अलका पटरे, सरचिटणीस तुकाराम सपकाळ यांच्यासह दिपक एरंडे, पी. एस. सुरवसे, एस. ए. जांबुतकर, जी. के. भिसे, जी. एस. मोहिते, एम. के. पाकळे, एस. के. राठोड, एम. बी. दांडगे, एस. एस. सूर्यवंशी, रवींद्र पाटील, नितीन मगरे, सीमा रांजळे, के. एन. निकम, शिल्पा काशिनंद, व्ही. ई. भिंगारे आदी तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पाटेगाव पुलाखाली गोदावरीच्या वाहत्या पाण्यात पोत्यात आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह!



**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण /प्रतिनिधी/बबन उदावंत** /पैठण ते शेवगाव रोड पाटेगाव येथील पुलाखाली गोदावरी नदीच्या पाण्यात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळुन आला आहे.

मृतदेह पोत्यामध्ये बांधुन पाण्यामध्ये टाकल्याचे आढळुन आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.या घटनेची माहीती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल पाटील,पोलिस निरिक्षक महादेव गोमारे,सपोनि सि.पि.पवार,उपनिरिक्षकप्रमोद यादव,सफौ सुधिर वाहुळ,पोलिस हवलदार नरेंद्र अंधारे,मुज्जु पठाण,भाऊसाहेब तांबे या पोलीस पथकाने शासकीय पंचाच्या उपस्थितीत सदर अनोळखी मृतदेहाची पाहणी केली.

मयताची ओळख पटवण्यात आलेली नसल्याचे एकच खळबळ उडाली आहे.

चौकशीमध्ये या मृतदेहाचे वय अंदाजे २५ते ३०वर्ष असल्याचे समजते,तसेच याव्यक्तीचा पुर्ववैमनस्यातुन खुन करुन सदरिल मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या हेतुने गोदावरीच्या वाहत्या पाण्यात पोत्यात बांधुन आणुन टाकल्याचा अंदाज पैठण पोलिसांनि व्यक्त केला आहे.

# आ. विलास भुमरे यांच्या हस्तक्षेपामुळे अतिक्रमण हटाव मोहीम स्थगित

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी / प्रतिनिधी/ हारून शेख/** पैठण तालुक्यातील जायकवाडी (ऊ) येथील शासकीय वसाहतीतील घरे पाटबंधारे विभागाच्या अतिक्रमण हटाव पथकाने जमीनदोस्त केल्यानंतर, तालुक्यातील सर्वात मोठ्या मागासवर्गीय नागरी वस्त्या असलेल्या राहुलनगर, संजयनगर व दाळवाडी या परिसरांकडे पथकाचे लक्ष वळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

**राहुलनगर, संजयनगर, दाळवाडी नियमानुकूल करण्यासाठी १८ रोजी विशेष ग्रामसभा**

दरम्यान, या प्रकरणात आमदार विलास बापू भुमरे यांनी तात्काळ हस्तक्षेप करत संबंधित विभागांचे अधिकारी व पोलीस प्रशासनाला अतिक्रमण हटाव कारवाई तात्काळ थांबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले. तसेच या वस्त्या नियमानुकूल करण्यासाठी विशेष ग्रामसभा घेण्याचे आदेश दिल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



राहुलनगर, संजयनगर व दाळवाडी परिसरातील रहिवाशांवर बेघर होण्याची वेळ आली असताना, नागरिकांनी आमदार भुमरे यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली व अधिकाऱ्यांना कारवाई थांबवण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी कातपूर ग्रामपंचायतीला सात दिवसांच्या आत विशेष ग्रामसभा बोलावून या वसाहतींच्या जागा नियमानुकूल करण्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याचे आदेश देण्यात आले. हा प्रस्ताव पंचायत समिती व तहसील कार्यालयामार्फत शासनाकडे सादर करण्यात येणार असून, अंतिम मंजुरीसाठी आपण स्वतः प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन आमदार भुमरे यांनी दिले.

त्यानुसार कातपूर ग्रामपंचायतीने दि. १८ रोजी राहुलनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात विशेष ग्रामसभेचे आयोजन केले आहे. त्यामुळे भयभीत झालेल्या नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

यावेळी शिवसेना तालुका अध्यक्ष अण्णा लबडे, कातपूरचे सरपंच धनंजय मोरे, उपसरपंच माया खडसन, ग्रामपंचायत सदस्य तसेच राहुलनगर, संजयनगर, दाळवाडी, जायकवाडी व राजीवनगर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारीही यावेळी उपस्थित होते.

## हर मास-एक उपवास'चा शंखनाद

छत्रपती संभाजीनगर: भारत मंडपम येथे आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय जनमंगल परिषदेत हर मास-एक उपवास (दर महिन्याला एक उपवास) या अभियानाचा शंखनाद करण्यात आला. याप्रसंगी जैन जगताचे तेजस्वी तपस्वी संत अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर जी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत योग गुरु बाबा रामदेव जी, लोकसभा अध्यक्ष श्री ओम बिरला जी, पर्यावरण मंत्री श्री भूपेंद्र यादव जी, आचार्य बालकृष्ण जी, पीठाधीश्वर बाबा बालकनाथ योगी जी, जैन संत लोकेश मुनि जी, इंडिया टीव्हीचे चेअरमन श्री रजत शर्मा, डॉ. एस. के. सरीन, डॉ. अनुराग वारने, भारतीय शिक्षण बोर्डाचे चेअरमन एन. पी. सिंह यांच्यासह अनेक संत, विद्वान आणि लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते.

# पिंपरखेडा (गेवराई गुंगी) येथील कल्याणी जाईबहार घोडके यांची भूवैज्ञानिक अधिकारी म्हणून निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी** / कन्नड तालुक्यातील पिंपरखेडा (गेवराई गुंगी) येथील मुलगी कल्याणी भारती हरिदास जाईबहार (घोडके) हिने आपल्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर MPSC मार्फत भूजल सर्वेक्षण विकास व यंत्रणा (GSDA) विभागात कनिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, गट-ब (राजपत्रित) पदावर निवड मिळवली आहे. या यशामुळे तिने समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

कल्याणी जाईबहार यांचे कुटुंबीय पिंपरखेडा येथील रहिवासी असून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. कल्याणी पाच वर्षांची असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर आई भारती हरिदास जाईबहार यांनी मोलमजुरी व शिवणकाम करून दोन्ही मुलींचे शिक्षण पूर्ण केले.कल्याणी यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपरखेडा येथे इयत्ता सातवीपर्यंत झाले. आठवी ते दहावी शिक्षण जिजामाता माध्यमिक विद्यालय, पिंपरखेडा येथे, तर अकरावी-बारावी महात्मा फुले महाविद्यालय, पिशोर येथे पूर्ण झाले.

सन २०११ मध्ये त्यांचा विवाह तान्हाजी सांडू घोडके (गेवराई गुंगी, ता.फुलंब्री) यांच्याशी झाला. शिक्षणाची आवड लक्षात घेऊन पतीने पुढील शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहन दिले.सन २०१२ ते २०१५ दरम्यान त्यांनी देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून B.Sc. पदवी पूर्ण केली. त्यानंतर २०१५ ते २०१७ मध्ये Government Institute of Science, छत्रपती



संभाजीनगर येथून M.Sc. (Geology) पदवी संपादन केली.

२०१९ मध्ये त्या एका बाळाच्या आई झाल्यामुळे काही काळ अभ्यासात खंड पडला. मात्र २०२२ पासून नव्याने जोमाने अभ्यास सुरू करून, दि. १० डिसेंबर २०२५ रोजी MPSC परीक्षेतून त्यांची कनिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी (GSDA) म्हणून निवड झाली.यापूर्वीही २०१७ व २०१८ मध्ये त्यांची Mangalore University येथे Research Scholar म्हणून निवड झाली होती.या यशामध्ये आई, बहीण, पती, मुलगा, कुटुंबीय, शिक्षकवृंद, मित्र-मैत्रिणी, गावकरी व नातेवाईक यांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे पती तान्हाजी सांडू घोडके यांनी नुकतीच Ph.D. पूर्ण केली असून अमेरिका व लिथुआनिया येथे त्यांनी संशोधन सादर केले आहे. तसेच त्यांचे धाकटे दीर किशोर घोडके हे भू-खनिकर्म अधिकारी असून त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.सातत्याने प्रयत्न व मेहनत केली तर यश निश्चित मिळते, असा प्रेरणादायी संदेश कल्याणी जाईबहार घोडके यांनी युवक-युवतींना दिला आहे.

# गंगापूर नगरपालिकेचा कारभार रामभरोसे

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर / प्रतिनिधी** / गंगापूर नगरपालिकेच्या कार्यप्रणालीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून शहरातील काही प्रभागांमध्ये कचरा संकलनासाठी येणारी घंटागाडी नियमित न येत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. स्वच्छतेच्या बाबतीत नगरपालिकेचा कारभार पूर्णतः रामभरोसे सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

शहरातील काही प्रभागांमध्ये घंटागाडी दररोज कचरा संकलनासाठी येत असली तरी अनेक प्रभागांमध्ये ती आठवड्यातून दोन-तीन दिवसही येत नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे नागरिकांना घरातील ओला व सुका कचरा साठवून ठेवावा लागत असून, अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला किंवा मोकळ्या जागांवर कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येत आहेत. यामुळे दुर्गंधी पसरत असून, डास व माश्यांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.




या संदर्भात काही प्रभागांतील नागरिकांनी नगरपालिकेच्या स्वच्छता विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून घंटागाडी नियमित पाठवण्यात यावी, अशी मागणी केली होती. मात्र तोंडी आश्वासन देण्यात येऊनही प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही सुधारणा झालेली नाही, असा आरोप नागरिक करत आहेत. काही वेळा तक्रार केल्यानंतर एक-दोन दिवस घंटागाडी येते, मात्र त्यानंतर पुन्हा ती गायब होते, असेही नागरिकांनी सांगितले.

**काही प्रभागांमध्ये घंटागाडी न येत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय**

घंटागाडी चालकांशी संपर्क साधल्यावर गाडी खराब आहे, आज कर्मचारी कमी आहेत किंवा हा प्रभाग आमच्या रूटमध्ये नाही अशी उत्तरे देऊन टाळाटाळ केली जात असल्याचेही समोर आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढत असून, नगरपालिकेच्या नियोजनावर आणि देखरेखीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

गंगापूर नगरपालिका गेल्या चार वर्षांपासून प्रशासकांच्या माध्यमातून चालवली जात आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते आदी मूलभूत सुविधांमध्ये सातत्याने समस्या निर्माण होत असून, प्रशासनाकडून अपेक्षित गांभीर्य दाखवले जात नसल्याचा आरोप केला जात आहे.


घंटागाडी काही प्रभागांमध्ये नियमित न येत असल्यामुळे नागरिकांना स्वतःच कचरा टाकण्यासाठी दूर अंतरावर जावे लागत आहे. अनेक वृद्ध, महिला व कामगार वर्गाला याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या नावाखाली मोठमोठ्या घोषणा केल्या जात असताना प्रत्यक्षात मात्र कचरा संकलनासारखी मूलभूत सेवा नीटपणे पुरवली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर अधिक तीव्र झाला आहे.

या पार्श्वभूमीवर नगरपालिकेचे प्रशासन या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरातील सर्व दहा प्रभागांमध्ये घंटागाडी दररोज, ठराविक वेळेत कचरा संकलनासाठी येणार का? चालक व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जाणार का? याकडे आता गंगापूर शहरातील सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास नागरिक आंदोलनाच्या मार्गावर जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

## ऑनलाईन कामकाजास तलाठी, मंडळाधिकारी महोद्यांचा स्पस्ट नकार

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ उदय कुलकर्णी** / तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी ऑनलाईन संगणिक कामकाजास नकार देऊन तशा अश्याचे एक निवेदन त्यांनी नायब तहसीलदार श्री.प्रशांत काळे यांना देऊन अशी मागणी केली आहे की,ग्राम महसूल व मंडळ अधिकारी यांना ऑनलाईन कामकाजासाठी जी यंत्रणा म्हणजेच लॅपटॉप,प्रिंटर, स्कॅनर पुरविण्यात आले होते.त्यांची अवस्था सद्या स्थित मोडकळीस आलेली असुन सध्याची ती उपकारणे म्हणजे असुन घात नसुन खोलंबा आशा अवस्थेत आहे.त्याद्वारे ई पीक पाहणी मंजुरी वितरिक्त कुठलीही कामे होत नसुन त्यातच पूर्ण वेळ जात आहे. तसेच त्या वितरिक्त इतर कुठलीही कामे व जबाबदारी आमचेवर टाकू नये म्हणून निवेदनात नमुद करण्यात आले आहे.त्यातच तलाठी संघाने केलेल्या मागण्या व त्याच्या पूर्ततेसाठी जमावबंदी आयुक्त यांनी अद्याप कुठलाही आदेश निर्गमित केलेला नाही.त्यामुळे तलाठी संघाच्या अधिपत्याखाली सोमवार दि.१५ डिसेंबर पासून ग्राम महसूल व मंडळ अधिकारी यांनी ऑनलाईन कामकाजास नकार देऊन सर्व संगणिक उपकारणे तहसील कार्यालयात जमा केली आहे.सदर दिलेल्या निवेदनावर तालूका तलाठी संघाचे अध्यक्ष श्री.बाळू घटे,उपाध्यक्षा अलका पटरे,सरचिटणीस तुकाराम सपकाळ, दिपक एरंडे, पी.एस.सुरवसे, एस.ए.जांबुतकर,जी.के. भिसे,जी.एस.मोहिते,एम.के.पाकळे, एस.के.राठोड, एम.बी.दांडगे , एस.एस.सूर्यवंशी,रवींद्र पाटील, नितीन मगरे, सीमा रांजळे, के. एन.निकम, शिल्पा काशिनंद, व्ही.ई.भिंगारे,यासह इतर तलाठी व मंडळ अधिकारी महोद्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# जिल्ह्यातील ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**२०२४-२५ वर्षाची खरीप पिकांची अंतिम पैसेवारी जाहीर**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** सन २०२४-२५ या वर्षाच्या खरीप हंगामात खरीप गावांची तसेच ज्या रब्बी गावांत दोन तृतीयांश पेक्षा जास्त खरीप-ात पेरणी केलेली आढळली आहे, त्या गावांची अंतिम पैसेवारी देखील खरीप हंगामात जाहीर करण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार जालना जिल्ह्याच्या आठ तालुक्यातील खरीप पिकांच्या पैसेवारीमध्ये खरीप गावे एकूण ६६७ व रब्बी गावे २९८ अशा एकूण ९६५ गावांची खरीप अंतिम पैसेवारी जाहीर केली आहे. यामध्ये जिल्ह्या-तील ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील ९७१ गावांपैकी ६६७ खरीप गावे व २९८ रब्बी गावे असे एकुण ९६५ गावांची सुधारित पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. तर परतूर तालुक्यातील राणी वाहेगाव हे गाव पूर्णत: निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे त्या गावाची पैसेवारी जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच मंठा तालुक्यातील चांदेश्वर व गोपेगाव हे गाव पुर्णत: निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे तसेच गारटेकी, सोनुनकरवाडी व किर्तापूर तांडा या गावांना महसूल दर्जा प्राप्त नसल्यामुळे मंठा तालुक्यातील ५ गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आली नाही. जालना जिल्ह्यातील पैसेवारी जाहीर केलेल्या एकुण ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे. खरीप पिकांची हंगामी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. जालना तालुका - १५१ गावे, बदनापूर-९२, भोकरदन-१५६, जाफ्राबाद-१०१, परतूर-९८, मंठा-११७, अंबड-१३८, घनसावंगी-११८ आदि गावांचा समावेश आहे.

# शुक्रवारी भाजपच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती - भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना महानगर च्या वतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दि. १९ डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी सकाळी १०.०० वा भारतीय जनता पार्टी कार्यालय, संभाजीनगर, जा-लना येथे घेण्यात येणार आहे.यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री मा.रावसाहेब पाटील दानवे, भाजपा जालना महानगरपालिका निवडणूक प्रभारी खा.डॉ.भागवत कराड, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, आ.संतोष पाटील दानवे, जालना महानगरपालिका निवडणूक प्रमुख माजी आ.कैलासजी गोरंट्याल, जा-लना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी शहराध्यक्ष राजेश राऊत, अशोक आण्णा पांगारकर, सतीश जाधव, विजय कामड, विमलताई आगलावे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती रा-हणार आहे.त्याचबरोबर मुलाखतीस येणाऱ्या व राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस येताना आपण ज्या राखीव प्रवर्गातून निवडणूक लढवू इच्छितो असे आवाहन भाजपा जा-लना महानगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत आहे.

# लखमापुरी मनरेगा सिंचन विहीर घोटाळा

## चोरांच्या उलट्या बोंबा; खरे दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा पंचायत समिती अंबडचा प्रकार

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (प्रतिनिधी)** अंबड तालुक्यातील लखमापुरी येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सिंचन विहिरीच्या कामात गंभीर गैरव्यवहार झाल्याचा प्रकार समोर आला असून, या प्रकरणात खऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न करता केवळ एका रोजगार सेवकालाच लक्ष्य करून प्रकरण झाकण्याचा प्रयत्न पंचायत समिती अंबडकडून होत असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणाबाबत जिल्हा परिषद जालना व मनरेगा विभागाने स्पष्ट निरीक्षणे नोंदवूनही गटविकास अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई टाळल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

लखमापुरी येथील रहिवासी सोमनाथ दादासाहेब गाढे यांनी मनरेगा योजनेंतर्गत गट क्रमांक १५३ मधील सिंचन विहीर बोगस असून प्रत्यक्ष खोदकाम न करताच निधी उचलण्यात आल्याची तक्रार वेळो-वेळी पंचायत समिती अंबड, जिल्हा परिषद जालना तसेच मनरेगा उप जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केली होती. तक्रारदाराच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यात आली. चौकशीत अनेक गंभीर त्रुटी व नियमबाह्य बाबी उघड झाल्या.

जिल्हा परिषद जालना येथील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) यांच्या दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी च जा क्र जिपजा/प/ मग्रारोहयो/ २०२५/ कवी /१०१७१ च्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, मूळ मंजुरी गट क्रमांक २३१ साठी असताना प्रत्यक्षात गट क्रमांक १५३ मध्ये काम दाखवण्यात आले. याशिवाय, एका ठिकाणी आधीप-ासून अस्तित्वात असलेली जुनी सामूहिक विहीर नवीन सिंचन विहीर म्हणून दाखवून निधी उचलल्याचेही निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, या बोगस कामाच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी, मोजमाप, तांत्रिक मंजुरी आणि देयक प्रक्रियेत सहभागी असलेले किमान तीन अधिकारी दोषी असल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट होते. तक्रारदार यांनी अनेक वेळा पंचायत समिती अंबड येथे तक्रार दाखल केल्यानंतर पंचायत समिती अंबड चे अधिकारी चौकशी करण्यासाठी नेमलेले अधिकारी खुशाल रोजगार सेवक लखमापूरी यांच्या बोगस विहिरी वरती जाऊन बोगस पाहाणी करायचे खोदकाम करताना चे लेबर फोटो ऑडिट करुन बोगस पंचनामा करून वरिष्ठ अधिकारी यांच्या डोळ्यात धुळफेक करण्याचं काम करायचे

या प्रकरणात आणखी धक्कादायक बाब म्हणजे, या सिंचन विहिरीचा लाभार्थी दुसरा-तिसरा कोणी नसून खुद्द ग्राम रोजगार सेवकच असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे कुंपणानेच शेत खाल्ले अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या निदर्शनास हा संपूर्ण प्रकार आणून दिल्यानंतर त्यांनी पंचायत समिती अंबडला दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र, त्या सूचनांनंतर गटविकास अधिकारी ज्योती वि कवडदेवी यांनी दिनांक ०१ डिसेंबर २०२५ रोजी केवळ ग्राम रोजग-ार सेवकावरच कारवाई करण्यासंदर्भात पत्र काढले. या पत्रात गट क्रमांक १५३ मधील विहिरीवर झालेला खर्च ७.८० टक्के व्याजासह वसूल करण्याचे आदेश देण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात निधी मंजूर करणारे, कामाची खोटी पाहणी करणारे आणि वरिष्ठांना चुकीची माहिती सादर करणारे अधिकारी मात्र पूर्णपणे वगळण्यात आले आहेत.तक्रारदार यांच्या मते खरे आरोपी तर प्रत्येक वेळी खोटी माहिती खोटे पंचनामा करून खोट्या पद्धतीने फोटो अँडिट करून वरिष्ठांच्या डोळ्यात धुळफेक करणारे चौकशी साठी नेमण्यात आलेले अधिकारी आहेत परंतु परत त्यांनी केलेल्या महाभयंकर गुन्हा वरती पांघरूण घालण्यासाठी परत पंचायत समिती अंबड चे अधिकारी करत आहेत आशा पद्धतीने तक्रारदार गाढे यांच म्हणनं आहे.

या पार्श्वभूमीवर पंचायत समिती अंबडमधील काही अधिकाऱ्यांनी वेळ-ोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करून खोटी माहिती सादर




केल्याचा गंभीर आरोप होत आहे. चौकशी अहवालात दोषी ठरलेल्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याऐवजी त्यांना आश्रय देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

या प्रकरणात केवळ एका कर्मचाऱ्यावर कारवाई करून प्रशासन आपली जबाबदारी झटकत असल्याचा आरोप करत तक्रारदारासह स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मनरेगा योजनेतील या गंभीर घोटाळ्यात सहभागी असलेल्या सर्व दोषींवर - मग ते गटविकास अधिकारी, तांत्रिक सहाय्यक, सीसीडीओ, एपीओ असोत - निष्पक्ष व कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा, हा प्रकार प्रशास-नातील भ्रष्टाचाराला पाठीशी घालणारा धोकादायक पायंडा ठरेल, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा- विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

## विभागीय आयुक्तांचा गावातील नागरिकांशी ई ग्रामसंवाद - एक दिवस' उपक्रमांतर्गत थेट संवाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** गावातील पाणीपुरवठा योजना, पाणंद रस्ते, अंगणवाडी व शाळा इमारती, स्मशानभूमी, घरकुल तसेच सौर ऊर्जेच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत नागरिकांच्या अडचणी तत्काळ सोडवाव्यात. ग्रामविकास प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून प्रशासकीय यंत्रणांनी ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावी व वेळेत अंमलबजावणी करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.विभागीय आयुक्त पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील आठ जिल्ह्यांतील निवडक गावांमधील नागरिकांशी 'ई ग्रामसंवाद - एक दिवस' उपक्रमांतर्गत ऑनलाईन वेबिनारद्वारे थेट संवाद साधला. या वेळी अपर आयुक्त मंजुषा मिसकर, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, सहायक आयुक्त ज्ञानोबा मोकाटे उपस्थित होते. संवादात संबंधित गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पापळकर म्हणाले की, गावातील पाणीटंचाईच्या नियोजनात पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे. नागरिकांनी मांडलेल्या अडचणी तत्काळ सोडवून त्यामध्ये कोणताही विलंब होणार नाही, याची दक्षता गा-वपातळीवरील प्रशासकीय यंत्रणांनी घ्यावी. जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना, महिला बचत गटांचे सक्षमीकरण, अंगणवाडी सुविधा तसेच प्रत्येक गावात सुविधायुक्त स्मशानभूमी उपलब्ध असणे गरजेचे आहे. ज्या गावांमध्ये या सुविधा उपलब्ध नाहीत, तेथे लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयाने तातडीने पाठपुरावा करावा. गावात एकही कुटुंब बेघर राहणार नाही, यादृष्टीने प्रशासनाने नियोजन करावे, असे स्पष्ट निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

संवादादरम्यान बीड जिल्ह्या-तील पाटोदा तालुक्यातील नफरवाडी, परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील हादगाव, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्या-तील करोडी तसेच लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील



नागरिकांनी त्यांच्या गावांतील विविध समस्या मांडल्या. विभागीय आयुक्तांनी संबंधित प्रशासनाला या अडचणी तत्-परतेने सोडवून त्याबाबतचा अह-वाल विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांतील नागरिकांनी या संवादात सहभाग नोंदविला. दर पंधरवाड्याला प्रत्येक जिल्यायातून एक गाव निवडून तेथील नागरिकांशी थेट हा संवाद साधला जाणार आहे. या उपक्रमामुळे गावातील प्रश्न समजण्यास मदत होते. योजनांचाही आढावा प्रभावी ठरतो.

# जिल्ह्यात पानटपऱ्यावर कारवाईचा धडाका, ४९०० रुपयांचा दंड वसुल

**आत्ताच एक्सप्रेस/जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक पंकज जाधव, सहा. पोलीस उपनिरिक्षक योगेश उबाळे तसेच अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील मंठा रोड येथे अवैधरित्या गुटखा, तंबाखु, मावा, जर्दा, खर्रा आणि सुटट्टे सिगारेट इत्यादींची विक्री करणाऱ्या तसेच तंबाखु नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व पानटपरीधारकांवर कोटपा- २००३ कायदा अंतर्गत जिल्हा तंबाखु नियंत्रण अंमलबजावणी पथकाद्वारे छापे टाकण्यात आले. यामध्ये कायद्याअंतर्गत विविध कलमानुसार एकुण ११ पानटप-यांवर कारवाई करुन ४ हजार ९०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला. ही कारवाई संपुर्ण जिल्हाभरात यापुढेही जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. तरी पानटपरी धारकांनी अवैधरित्या कुठल्याही तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करु नये. असे आवाहन करण्यात आले आहे. ही कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखेचे एस.पी. तनपुरे,समुपदेशक सोनाजी भुतेकर, सामाजिक कार्यकर्त्या सुनंदा कोरडे व ग्रामीण विकास संस्थेचे विभागीय व्यवस्थापक मंगेश गायकवाड यांच्याद्वारे करण्यात आली.असे जिल्हा शल्यचिकित्सक, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अमृतलक्षीत गटातील उमेदवारांसाठी जिल्ह्यात विविध प्रशिक्षणाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अमृत पुणे व उद्योग संचालनालय महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील अमृत लक्षीत गटातील उमेदवारांसाठी नि:शुल्क प्रशिक्षण जिल्ह्यात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. अमृत क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम ६ दिवस, अमृत निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम १८ दिवस, अमृत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम २१ दिवस, अमृत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम ३० दिवस इत्यादी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन जिल्ह्यातील विविध तालुक्यात करण्यात येणार असून सदरील कार्यक्रमाचे व अमृत संस्थेअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांविषयी सदरील कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यात येणार आहे.तरी खुल्या प्रवर्गातील अमृत लक्षित गटातील ब्राह्मण, बनिया, मारवाडी ठाकूर, गुजराती, यलमार, जाट , सिंधी, राजपूत, कोमटी,नायर एयांगर ,कायस्त ,कामा, राजपुरोहित समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवक- युवतींनी दिलीप शिलवंत यांच्याशी अथवा जिल्हा व्यवस्थापक, अमृत कार्यालय,जालना, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जिल्हा कार्यालय, जालना द्वारा-मराठा पार्क बिल्डींग, विशाल कार्नर, छत्रपती संभाजीनगर चौफुली, जालना येथे संपर्क साधावा, असे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### अल्पसंख्याक हक्क दिनाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणुन १८ डिसेंबर २०२४ हा दिवस साजरा करण्यात येणार आहे. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशिर हक्काची जाणीव होण्यासाठी अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात येत असतो. अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त गुरुवार दि.१८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तरी नागरिकांनी अल्पसंख्याक हक्क दिन कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

# घनसावंगी पंचायत समितीत नव्या बीडीओंचा सत्कार




**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड / प्रतिनिधी /** घनसावंगी पंचायत समिती कार्यालयात नूतन गटविकास अधिकारी (बीडीओ) म्हणून कु. ऐश्वर्या चितारी यांनी आज अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.या सत्कारप्रसंगी शिवाजीराव पाटील पवार, उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा, जालना जिल्हा तसेच श्री. परमेश्वर लक्ष्मणराव सोनवणे, तालुका अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती-जमाती आघाडी, घनसावंगी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी कु. ऐश्वर्या चितारी यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्यकाळात घनसावंगी तालुक्यातील ग्रामीण विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

पंचायत समितीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकास योजना प्रभावीपणे व पारदर्शकपणे अंमलात आणल्या जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून तालुक्याचा सर्वांगीण विकास साधता येईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना कु. ऐश्वर्या चितारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

शासनाच्या सर्व योजना वेळेत, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख पद्धतीने राबविण्यास प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी आश्वासन दिले.या कार्यक्रमास पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचारी तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणावर मर्यादा की प्रगतीवर बंदी?

राज्यातील उच्च शिक्षण धोरणाबाबत सरकारची दिशा नेमकी कुठे चालली आहे, हा प्रश्न सध्या केवळ शैक्षणिक वर्तुळापुरता मर्यादित न राहता व्यापक सामाजिक चर्चेचा विषय बनला आहे. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळात केलेल्या विधानानंतर पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अधिछात्रवृत्ती मर्यादित करण्याचे संकेत मिळाले आहेत. एकाच कुटुंबातील पाच जण पीएच.डी. करतात असे उदाहरण देत हा निर्णय योग्य ठरवण्याचा प्रयत्न केला जात असला, तरी या विधानामागील वास्तव, त्याचे सामाजिक परिणाम आणि दीर्घकालीन दुष्परिणाम यांचा सखोल विचार झाला आहे का, असा गंभीर प्रश्न उपस्थित होतो.

शिक्षण हे कुणाचे मक्तेदारीचे साधन नाही. ते केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांसाठी राखीव असू शकत नाही. उलट, शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. बहुजन, दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जमाती तसेच आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी उच्च शिक्षण म्हणजे केवळ वैयक्तिक यश नव्हे, तर पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अन्यायातून बाहेर पडण्याचा मार्ग आहे. अशा परिस्थितीत अधिछात्रवृत्तीवर मर्यादा घालण्याचा विचार म्हणजे या समाजघटकांच्या आशा-आकांक्षांवरच मर्यादा घालण्यासारखे आहे.

पीएच.डी. संशोधन हा शिक्षणाचा सर्वोच्च टप्पा मानला जातो. संशोधन करताना विद्यार्थ्यांना पूर्णवेळ अभ्यास, प्रयोग, क्षेत्रकार्य, लेखन आणि सादरीकरण करावे लागते. या काळात नियमित उत्पन्नाचा कोणताही स्रोत नसतो. अशा वेळी अधिछात्रवृत्ती हा विद्यार्थ्यांचा जीवनाधार अस-तो. ती कमी करणे किंवा मर्यादित करणे म्हणजे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडण्यास भाग पाडणे होय. परिणामी, संशोधनाची गुणवत्ता घटेल, विद्यापीठांमधील बौद्धिक वातावरण खालावेल आणि राज्याची एकूण ज्ञाननिर्मिती प्रक्रिया कमकुवत होईल.

एकीकडे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठीचा निधी अन्य बाबींमध्ये वळवला जात असल्याच्या चर्चा सुरू आहेत. संविधानाने ठरवून दिलेल्या तरतुदी असूनही या समाजघटकांसाठी असलेला निधी वेळेवर आणि योग्य कारणासाठी खर्च होत नसल्याचे चित्र अनेकदा समोर येते. अशा पार्श्वभूमीवर थेट संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आर्थिक सहाय्यावर गदा येणे हे सरकारच्या सामाजिक न्यायाच्या भूमिकेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. गैरवापर थांबवण्याची गरज नक्कीच आहे, मात्र त्यासाठी संपूर्ण व्यवस्थेलाच दोषी ठरवणे आणि सरसकट मर्यादा लादणे हा मार्ग लोकशाही, समताधिष्ठित आणि घटनात्मक मूल्यांना धरून नाही.

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राचा साक्षरता दर ८२.३४ टक्के आहे. महिलांच्या बाबतीत हा दर अजूनही सुमारे ७६ टक्क्यांच्या आसपास आहे. ग्रामीण भागात, विशेषतः आदिवासी आणि दुर्गम भागांमध्ये हा दर याहूनही कमी आहे. याच्या तुलनेत केरळसारख्या राज्यात साक्षरता दर ९४ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. हा फरक केवळ आकड्यांचा नसून, तो धोरणांचा, दृष्टिकोनाचा आणि शिक्षणा-वर केलेल्या दीर्घकालीन गुंतवणुकीचा आहे. ज्या राज्यांनी शिक्षणाला खर्च न मानता गुंतवणूक मानली, त्या राज्यांनी सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत आघाडी घेतली. महाराष्ट्राने मात्र जास्त शिकणे ही समस्या असल्यासारखी भूमिका घेतली, तर ही घसरणीची सुरुवात ठरू शकते.

एकाच कुटुंबातील अनेक विद्यार्थी पीएच.डी. करतात हे उदाहरण नकारात्मक दृष्टीने पाहण्याऐवजी, राज्याच्या बौद्धिक क्षमतेचे द्योतक म्हणून पाहिले पाहिजे. **- राज वाघमारे**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813